लोकमत

# अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वाघ यांचा सत्कार

**नाशिक :** महाराष्ट्रातील विना



अनुदानित अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये या तिन्ही राज्यस्तरीय असोसिएशनच्या अध्यक्षपदी के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांची नुकतीच बिनविरोध निवड झाल्याबद्दल कर्मवीर व्याख्यानमालेच्या कार्यक्रमात माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शाल व पुष्पगुच्छ देऊन समीर बाळासाहेब वाघ यांना सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी माजी खासदार डॉ. प्रतापराव वाघ तसेच नाशिक जिल्ह्यातील विविध संस्थाचालकांचे संस्थाचालक, प्राचार्य, पदाधिकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी आदी मान्यवर उपस्थित होते.

Hello Nashik
Page No. 3 Jun 07, 2022
Powered by: erelego.com

# के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयांत योग दिन

नाशिक । के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, फार्मसी, वरिष्ठ महाविद्यालय व शाळा यांमध्ये विविध महाविद्यालयाच्या प्रांगणात मंगळवार (दि.२१) रोजी योग दिनाचे आयोजन करण्यात आले. त्याचप्रमाणे उपसंचालक क्रीडा व युवक सेवा, नाशिक विभाग आणि नाशिक जिल्हा पतंजली योग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने योग दिनानिमित्त मीनाताई ठाकरे सभागृह येथे योग प्रशिक्षण शिबीर पार पडले. यावेळी क्रीडा व युवक सेवा, नाशिकच्या उपसंचालक सुनंदा पाटील, क्रीडाधिकारी अरविंद चौधरी, गोकुळ घुगे, मिलींद गणकर, शांताराम जोशी, ज्ञानेश्वर टर्ले उपस्थित होते.

AaplaMahanagar Edition
Jun 23, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

# ‘के. के. वाघ’ अभियांत्रिकीच्या पाच विभागांना एनबीए मानांकन

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाच्या पाच विभागांचे मानांकन नॅशनल बोर्ड ऑफ अ‍ॅक्रेडिटेशन (एनबीए) या राष्ट्रीय संस्थेने सन २०२२-२३ ते २०२४-२५ या पुढील तीन शैक्षणिक वर्षांसाठी मानांकन दिले आहे. त्यामध्ये कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक अ‍ॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, केमिकल इंजिनिअरिंग या विभागांचा समावेश आहे.

के. के. वाघ महाविद्यालयाच्या ८ विभागांना यापूर्वी हे सन २०१९-२० ते २०२१-२२ या तीन शैक्षणिक वर्षांसाठी एनबीए मानांकित होते. त्यामध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि मास्टर ऑफकॉम्प्युटरअ‍ॅप्लिकेशन(एमसीए)विभागाचा समावेश आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयास नॅकची ‘अ’ श्रेणी प्राप्त आहे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०३१-३२ या दहा वर्षांसाठी ‘ऑटोनॉमस’ अर्थात ‘स्वायत्त’ महाविद्यालयाचा दर्जा मिळाला आहे. पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये नाशिक विभागात वाघ अभियांत्रिकी हे पहिले स्वायत्त महाविद्यालय आहे.

गेल्या वर्षी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेतर्फे के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाची पुणे विद्यापीठांतर्गत आयडिया लॅबसाठी निवड झालेली आहे. वर्तमान परिस्थितीत के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन क्षेत्रात महाराष्ट्रातच नव्हे, तर देशाच्या क्षितिजावर गुणवत्तापूर्ण महाविद्यालय असा नावलौकिक मिळवला आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त अशोक मर्चंट, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य प्रा. के. नि. नांदूरकर आदींनी कौतुक केले.

**Dainik Pudhari, Dated 13-06-2022**

divyamarathi.com

दिव्य मराठी नाशिक, सोमवार,

# के. के. वाघ अभियांत्रिकीच्या पाच विभागांना एनबीए मानांकन

**महाविद्यालयाचे प्राचार्य के. एन. नांदुरकर यांची माहिती**

प्रतिनिधी | नाशिक

के. के. वाघ शिक्षण संस्था संचालित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाच्या पाच विभागास नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रेडिटेशन (एनबीए) या राष्ट्रीय संस्थेकडून २०२२-२३ ते २०२४-२५ या पुढील तीन शैक्षणिक वर्षांसाठी एनबीए मानांकन मिळाल्याची माहिती प्राचार्य प्रा. के. नि. नांदुरकर यांनी दिली.

महाविद्यालयाच्या या पाच विभागांमध्ये कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक अॅण्ड टेलिकम्युनिकेशन, सिव्हिल, इलेक्ट्रिकल, केमिकल इंजिनिअरिंग या विभागांचा समावेश आहे. महाविद्यालयाचे मॅकेनिकल इंजिनिअरिंग आणि मास्टर ऑफ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन (एमसीए) विभाग यांनाही एनबीए मानांकन मिळालेले आहेत. महाविद्यालयाच्या ८ विभागांना यापूर्वी २०१९-२० ते २०२१-२२ ही तीन शैक्षणिक वर्षासाठी एनबीए मानांकित होते. त्याचप्रमाणे, अभियांत्रिकी महाविद्यालयास नॅकची 'अ' श्रेणी प्राप्त आहे. विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे महाविद्यालयास १० वर्षांसाठी स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळाला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये नाशिक विभागात के. के. वाघ अभियांत्रिकी हे पहिले स्वायत्त महाविद्यालय असणार आहे.

**Divyamarathi, Dated 13-06-2022**

# वाघ अभियांत्रिकी कॉलेजच्या पाच विभागांना 'एनबीए'

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाच्या पाच विभागांचे नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिटेशन (एनबीए) या राष्ट्रीय संस्थेचे मानांकन प्राप्त झाले आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या पुढील तीन शैक्षणिक वर्षांकरिता 'एनबीए'मार्फत हे मानांकन देण्यात आले आहे.

महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर इंजिनीअरिंग, इलेक्ट्रॉनिक अॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग, सिव्हिल इंजिनीअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग, केमिकल इंजिनीअरिंग या विभागांना हे मानांकन मिळाले आहे. तसेच महाविद्यालयाचे मेकॅनिकल इंजिनीअरिंग आणि मास्टर ऑफ कॉम्प्युटर ऍप्लिकेशन (एमसीए) विभाग यांनाही पूर्वी एनबीए मानांकन प्राप्त झाले आहे. यापूर्वी वाघ इंजिनीअरिंगच्या ८ विभागांना या पूर्वी हे सन २०१९-२२ या तीन शैक्षणिक वर्षासाठी एनबीए मानांकन मिळाले होते. त्याचप्रमाणे, अभियांत्रिकी महाविद्यालयास नॅकची 'ए' श्रेणी प्राप्त आहे. विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२२-२०३२ या दहा वर्षांसाठी स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळाला.

**Maharashtra Times, Dated 13-06-2022**

# अभियांत्रिकीसाठी साडेसात हजार, फार्मसीच्या साडेचार हजार जागा

## बारावीनंतर पदवी शिक्षण, पुणे विद्यापीठाच्या ४५ हजार जागा

**अरुण मलाणी : सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ८ : इयत्ता बारावीचा निकाल जाहीर होताच प्रथम वर्ष प्रवेशाची लगबग सुरु होणार आहे. नाशिक जिल्हास्तरावर अभियांत्रिकीच्या पदवी अभ्यासक्रमाच्या सुमारे साडेसात हजार, औषधनिर्माणशास्त्र शाखेच्या सुमारे साडेचार हजार जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत विविध पदवी अभ्यासक्रमांच्या मिळून सुमारे ४५ हजार जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी उपलब्ध असणार आहेत.

बहुप्रतिक्षित बारावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता पुढील प्रवेश प्रक्रियेकडे विद्यार्थ्यांसह पालकांचे लक्ष लागून आहे. अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अशा विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षांची तयारी विद्यार्थ्यांकडून सुरु आहे. तर पुणे विद्यापीठ स्तरावरील विविध पारंपरिक अभ्यासक्रमासह शिक्षणशास्त्र, विधी अशा विविध अभ्यासक्रमांशी निगडित सुमारे ४५ हजार जागा नाशिक जिल्हास्तरावर उपलब्ध आहेत. ग्रामीण भागातील वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये त्यांच्या स्तरावर या जागांवर प्रवेश दिले जाणार आहेत. शहरातील काही महाविद्यालयात ऑनलाइन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविली जाते आहे. दरम्यान निकाल जाहीर झाल्यानंतर १७ जूनला गुणपत्रिका वाटप केले जाणार आहे, तत्पूर्वी विद्यार्थ्यांनी कागदपत्र सज्ज ठेवणेदेखील आवश्यक आहे.

### वैद्यकीय शिक्षणाच्या संधी

उत्तीर्णपैकी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना नीट परीक्षेच्या माध्यमातून वैद्यकीय शिक्षणाचा पर्यायदेखील खुला राहणार आहे. याअंतर्गत एमबीबीएस, बीडीएस यांसह बीएएमएस, बीएचएमएस, बीयुएमएस, फिजिओथेरपी, बी.एस्सी. (नर्सिंग) अशा वैद्यकीय शिक्षणक्रमांना प्रवेशाचा मार्ग नीट परीक्षेच्या कामगिरीच्या आधारे खुला होणार आहे.

**जिल्ह्यात व्यावसायिक शिक्षणक्रमांच्या उपलब्ध जागा अशा**

| अभ्यासक्रम | महाविद्यालये | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| बी.ई/बी.टेक. | २० | ७,४९८ |
| बी. फार्म. | २९ | २,३०० |
| फार्म. डी. | २ | ६० |
| डी. फार्म. | ३५ | २,१०० |
| बी.आर्क. | ३ | २०० |
| एचएमसीटी | १ | ६० |

### मुक्त विद्यापीठात शिक्षणक्रम

विद्यार्थ्यांना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांसाठी प्रवेशाची संधी उपलब्ध असणार आहे. विद्यापीठातर्फे इयत्ता बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी विविध विद्याशाखांचे शिक्षणक्रम उपलब्ध आहेत.

लोकमत

# हॅलो नाशिक

epaper.lokmat.com

# नाशिकच्या मुली लई हुश्शार..

## जिल्ह्याचा निकाल ९२.६५ टक्के : ९२.४२ टक्के मुले




**जिल्ह्यात तब्बल १८ हजार ५६६ विद्यार्थी बारावी उत्तीर्ण**

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे बुधवारी (दि. ८) बारावीचा मार्च - एप्रिल २०२२ परीक्षांचा ऑनलाईन निकाल जाहीर करण्यात आला असून, या परीक्षेत नाशिक जिल्ह्यात ९५.१८ टक्के मुलींनी पास होऊन बाजी मारली आहे. विशेष म्हणजे उत्तीर्ण मुलींचे प्रमाण मुलांच्या तुलनेत २.७६ टक्क्यांनी अधिक असून, जिल्ह्यात ९२.४२ टक्के मुले, तर ९५.१८ टक्के मुली असे एकूण ९२.६५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

बारावीच्या परीक्षेत नाशिक जिल्ह्यातून विज्ञान शाखेचे सर्वाधिक विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यानंतर कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी या परीक्षेत लक्षवेधी यश संपन्न केले आहे. जिल्ह्यातून विज्ञान शाखेच्या ३१ हजार ४०४, कला शाखेच्या २५ हजार ४५३, वाणिज्यचे १३ हजार ४३९ एमसीव्हीसीचे २ हजार ३०५ व तंत्रविज्ञान शाखेचे ३६ विद्यार्थी आहे.

### कळवण प्रथम, नाशिक शहर शेवटी; पण..

- नाशिक जिल्ह्यात बारावी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कळवण तालुक्यात सर्वाधिक आहे. येथील ९८.५५ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, यात ९८.२४ टक्के मुले, तर ९८.९५ टक्के मुलींचा समावेश आहे, तर नाशिक मनपा क्षेत्रात ९१.०२ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.
- मात्र, जिल्ह्यात सर्वाधिक २० हजार ४६५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २० हजार ३९७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून, तब्बल १८ हजार ५६६ विद्यार्थी बारावी उत्तीर्ण झाले आहेत, तर कळवण तालुक्यात उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या तुलनेत २ हजार ५३१ एवढी असल्याचे निकालाच्या सांख्यिकीय माहितीतून स्पष्ट होते.

### सूरज यादव, सुजल पाटीलला पैकीच्या पैकी गुण

१ डॉ. गुजर सुभाष हायस्कूलच्या हिंदी मीडियम व ज्युनिअर कॉलेज ऑफ कॉमर्सच्या वाणिज्य शाखेतील सूरज यादव व सूजल पाटील या विद्यार्थ्यांनी अकाऊंट विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून लक्षवेधी यश संपादन केले.

२ जालना जिल्ह्यातील सुदाम पांडुरंग खापरे या विद्यार्थ्याने इंदिरानगर भागात मामांच्या फळाच्या दुकानात काम करतानाच प्रसंगी हातगाडीवर फळांची विक्री करून बारावीत लक्षवेधी यश संपादन केले.

### १७ जूनला मिळणार विद्यार्थ्यांना गुणपत्रिका

बारावी परीक्षेचा निकाल ऑनलाईन पद्धतीने जाहीर झाल्यानंतर आता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष गुणपत्रिका मिळण्याची उत्सुकता आहे. ती शुक्रवारी (दि. १७) जूनला संपुष्टात येणार आहे. परीक्षेला प्रविष्ट सर्व विद्यार्थ्यांना १७ जूनला दुपारी ३ वाजता त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत गुणपत्रिकांचे वितरण करण्यात येणार आहे.

### तालुकानिहाय निकाल

| तालुका | नोंदणी | प्रविष्ट | उत्तीर्ण | प्रमाण |
|---|---|---|---|---|
| चांदवड | २१५८ | २१३१ | १९५० | ९१.५० |
| दिंडोरी | २७८४ | २७७१ | २६०४ | ९३.९३ |
| देवळा | १५१४ | १५०० | १४६२ | ९७.४६ |
| इगतपुरी | २३५२ | २३३० | २२३४ | ९५.८७ |
| कळवण | २५८२ | २५६८ | २५३१ | ९८.५५ |
| मालेगाव | ४२२१ | ४१९४ | ४०६६ | ९६.९४ |
| नाशिक | ३०९८ | ३०८६ | २७९५ | ९०.५७ |
| निफाड | ६९०५ | ६८५९ | ६४९१ | ९४.६३ |
| नांदगाव | २९४७ | २९२२ | २७९२ | ९५.५५ |
| पेठ | ११९५ | ११७५ | १११४ | ९४.८० |
| सुरगाणा | २१९४ | २१७२ | २१०१ | ९६.७३ |
| सटाणा | ३८२१ | ३७९४ | ३५८० | ९४.३५ |
| सिन्नर | ४४०६ | ४३७७ | ४०७१ | ९३.०० |
| त्र्यंबकेश्वर | १९३७ | १९२२ | १८५१ | ९६.३० |
| येवला | ३७५१ | ३७३७ | ३६१७ | ९६.७८ |
| मालेगाव मनपा | ६३०७ | ६२८६ | ५८२३ | ९२.६३ |
| नाशिक मनपा | २०४६५ | २०३९७ | १८५६६ | ९१.०२ |

लोकमत

महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१९/४६४/४९३
ई-मेल : desk17@dtemaharashtra.gov.in
वेबसाईट : https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक : १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२२/७४ दिनांक :

# जाहिरात

**उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२२-२३ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking 200 च्या आत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल अशा विद्यार्थ्यांकरिता शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि. ०४.१०.२०१८, क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/ तांशि-४ दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१ व शासन शुद्धिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२७४ (भाग-२)/तांशि-४ दिनांक २२ मार्च, २०२२ व शासन पत्र क्रमांक पशियो-२०२२/प्र.क्र.१०८/तांशि-४, दि. ३ जून, २०२२ नुसार सदर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे.

सदर योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी ऑन लाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**या शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा/अभ्यासक्रम निहाय जागा उपलब्ध असतील :-**

| अ. क्र. | शाखा/अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदविका व पदव्युत्तर पदवी | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | कला | ०१ | ०१ | ०२ |
| २. | वाणिज्य | ०१ | ०१ | ०२ |
| ३. | विज्ञान | ०१ | ०१ | ०२ |
| ४. | व्यवस्थापन | ०१ | ०१ | ०२ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०१ | ०१ | ०२ |
| ६. | अभियांत्रिकी/ वास्तुकला शास्त्र | ०४ | ०४ | ०८ |
| ७. | औषधनिर्माणशास्त्र | ०१ | ०१ | ०२ |
| | एकूण | १० | १० | २० |

**सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत :**

- उमेदवार व उमेदवाराचे आई/वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.
- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्ययावत (सन २०२२ मधील) THE (Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking 200 च्या आत असणे बंधनकारक आहे.
- उमेदवाराच्या पालकांचे/कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरून सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२१-२२ मधील) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपद्धती इत्यादी माहिती करिता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या https://foreignscholarship2022.dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ व शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र. ११६/तांशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ चा शासन निर्णय तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र. २१८/तांशि-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ व दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ ची शासन शुद्धिपत्रके पहावीत व त्याअनुषंगाने अर्जाची छाननी करण्यात येईल.

इच्छुक उमेदवारांनी https://foreignscholarship2022.dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावा व online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित विभागीय कार्यालयात खालील वेळापत्रकानुसार सादर करावीत.

| क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे. | ९ जून, २०२२ ते ८ जुलै, २०२२ |
| २ | • ज्या उमेदवारांनी कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण येथे<br>व<br>• ज्या उमेदवारांनी व्यवस्थापन, अभियांत्रिकी/ वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यातील संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण येथे<br>वर नमूद केल्याप्रमाणे online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी सादर करावीत. | १० जून, २०२२ ते ११ जुलै, २०२२ (सायंकाळी ५.०० वा. पर्यंत) |

विभागीय कार्यालये, उच्च शिक्षण व विभागीय कार्यालये, तंत्र शिक्षण यांची यादी वरील संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

online अर्जाशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने केलेला अर्ज विचारात घेण्यात येणार नाही. इच्छुक उमेदवारांनी निर्धारित कालावधीत वरीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**(डॉ. अभय वाघ)**
**संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

DGIPR-2022-23/1166

**दिव्य मराठी विशेष** • आर्या मिश्राने विकसीत केला बॅटरीवर चालणार ट्रॅक्टर; ७.५ अश्वशक्ती, इंधनाला नवा पर्याय

# ट्रॅक्टरला सहा तासांचे चार्जिंग; काम करते सोळा तास

दिव्य मराठी
**मंडे पॉझिटिव्ह**

**प्रतिनिधी** | नाशिक



विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, पालकांचे पाठबळ अन् शिक्षकांचे मार्गदर्शन या त्रिसूत्रीने नवनवीन कल्पना जन्म घेतात. नाशिकमध्ये अनेक तरुण-तरुणी संशोधनाचे नवे अध्याय रचत असून आता. के. के. वाघ इंजिनिअरिंगमध्ये अभियांत्रिकी वर्षाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनीने शेतकऱ्यांचे भवितव्य सुखी व्हावे या उद्देशाने केलेले हे नवनिर्माण अनेक अर्थाने महत्वाचे ठरू शकणार आहे. आर्या मिश्रा असे या तरूणीचे नाव असून तीने बॅटरीवर चालणारा ट्रॅक्टर निर्माण केला आहे. जो सहा तासांच्या चार्जिंगमध्ये सोळा तास काम करतो.

शेती व्यवसायात अनेक कामांसाठी ट्रॅक्टरचे महत्त्व शेतकऱ्यांसाठी अनन्यसाधारण आहे. नाशिकसारख्या कृषी प्रधान जिल्ह्यात तर ते स्पष्टपणे अधोरेखीत होत असते. डिझेलच्या वाढत्या किमती तसेच त्यातून होणारे प्रदूषण यावर पर्याय म्हणजे बॅटरीवर चालणारा हा ट्रॅक्टर आर्याने तयार केला आहे जो ७.५ अश्वशक्तीचा असून त्यामध्ये ४८ व्होल्टची बॅटरी लावण्यात आली आहे. हा ट्रॅक्टर ए.सी.मोटरवर चालतो तसेच शेतामध्ये पिकांवर औषध फवारणी, पेरणी, नांगरणी ञअगदी सक्षमपणे करू शकतो. मागील आठवड्यातच या ट्रॅक्टरची यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे.

## ४.८५ लाख रुपये खर्च, स्टार्टअपच्या माध्यमातून प्रयत्न



*सध्या आमचे संशोधन व विकासाचे काम पूर्ण झाले असून यशस्वी चाचण्याही झाल्या आहेत. स्टार्टअपच्या माध्यमातून येत्या सहा महिन्यांचे याचे उत्पादन आम्ही सुरू करण्याच्या तयारीत आहोत. या पहिल्या प्रोटोटाईपकरिता ४.८५ लाख रुपये खर्च झाला त्यापैकी २.६७ लाख बॅटरीचा खर्च आहे. उत्पादन करतांना हा एकूण खर्च कमी होऊ शकणार आहे.*

**-आर्या मिश्रा,** संशोधक

आर्याला या प्रकल्पासाठी के.के. वाघ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ.समिर वाघ, प्राचार्य डॉ .केशव नांदुरकर, उपप्राचार्य डॉ शिरीष साने डॉ.रवींद्र मुंजे, शंतनू शुक्ला, डॉ.शरद धुमाळ, इंजिनिअर मनीष मिश्रा व इंजिनिअर. प्रेमलता मिश्रा यांनी मार्गदर्शन केले. तसेच अनिष रच्चा आणि कांचन शिंदे यांनी सहकार्य केले.

**वडिलांच्या पावलावर पाऊल**

आर्या ही इंजीनिअर. स्व. चंद्रभान मिश्रा यांची मुलगी आहे. स्व. चंद्रभान मिश्रा यांनी १९८४ मध्ये बॉटलपेकं हे तंत्रज्ञान जर्मनीतून आणून नाशिकच्या सातपूर औद्योगिक वसाहतीमध्ये कारखाना सुरू केला होता. आर्याने वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत नवा आयाम घडविला आहे.

Lokmat Times

# Engineering students participate in project competition cum exhibition

**Out of 295 projects developed by 10 engineering departments, 30 projects were short-listed**

**LOKMAT NEWS NETWORK**
NASHIK, JUN 7



Students and staff members present on the occasion.

A project competition and exhibition was organised at KK Wagh Institute of Engineering Education and Research, Nashik. The competition was inaugurated by chairman Sameer Wagh.

The event was organised for final year engineering students by the Internal Quality Assurance cell. Out of 295 projects developed by 10 engineering departments, 30 projects were short-listed by the experts - Sanket Kandare, Gourang Ambulkar and Rohit Kulkarni, who were the judges for the competition.

'Best Final Year Project' at Institute level was awarded to Abhishek Dhikale, Akshata Hire, Hari Khose and Sakshi Suryavanshi of Mechanical Engineering for their project on 'Design and Development of Sieve Mechanism for Seed Sowing Machine used in Agriculture' under the guidance of professor VK Matsagar.

The winners were felicitated in the presence of the Principal Dr KN Nandurkar and other dignitaries.

Prizes were also awarded to project groups of different departments under various categories.

लोकमत

न्यूज Inbox

# वाघ अभियांत्रिकीत पारितोषिक वितरण

नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालय इंटरनल क्वॉलिटी असुरन्स सेलच्या माध्यमातून प्रकल्पांचे उद्‌घाटन व पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयातील दहा विभागांतील एकूण २९५ प्रकल्पांपैकी प्राथमिक स्तरावर ३० प्रकल्पांची निवड तीन गटांमध्ये करण्यात आली. यापैकी सर्वोत्कृष्ट प्रकल्पांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. प्रा. डॉ. व्ही. के. मत्सागर यांच्या मार्गदर्शनाखाली अभिषेक ढिकले, अक्षता हिरे, हरी खोसे आणि साक्षी सूर्यवंशी या विद्यार्थ्यांनी प्रकल्पावर परिश्रम घेतले.

Hello Nashik
Page No. 2 Jun 06, 2022
Powered by: erelego.com

# वाघ अभियांत्रिकीत अंतिम वर्ष प्रकल्पांना पारितोषिक वितरण

**पंचवटी, ता. ५ :** के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयातर्फे इंटर्नल क्वालिटी असुरन्स सेलच्या माध्यमातून प्रकल्पांचे उद्घाटन नुकतेच संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्या हस्ते झाले, तर पारितोषिक वितरण प्राचार्य डॉ. नांदुरकर यांच्या उपस्थितीत झाले.

महाविद्यालयातील १० विभागांतील एकूण २९५ प्रकल्पांपैकी प्राथमिक स्तरावर ३० प्रकल्पांची निवड हार्डवेअर, सॉफ्टवेअर, हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर या तीन गटांमध्ये करण्यात आली. यात एकूण ९ हार्डवेअर, ९ सॉफ्टवेअर आणि १२ हार्डवेअर व सॉफ्टवेअर प्रकल्पांचा समावेश होता. यापैकी सर्वोत्कृष्ट प्रकल्पांना पारितोषिक देण्यात आली. महाविद्यालयीन स्तरावरील सर्वोत्कृष्ट प्रकल्प म्हणून यांत्रिक अभियांत्रिकी विभागातील 'शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या बियाणे पेरणी यंत्रासाठी चाळणी यंत्रणेची रचना आणि विकास' या शेतीसाठी उपयुक्त प्रकल्पास देण्यात आला. प्रा. डॉ. व्ही. के. मत्सागर यांच्या मार्गदर्शनाखाली अभिषेक ढिकले, अक्षता हिरे, हरी खोसे आणि साक्षी सूर्यवंशी या विद्यार्थ्यांनी प्रकल्पावर वर्षभर परिश्रम घेतले. तसेच तीन गटांतर्गत एकूण ५० हजार रुपयांची पारितोषिके देण्यात आली.

सॉफ्टवेअर गटात प्रथम पारितोषिक संगणक अभियांत्रिकी विभागातील 'अल्गोरिदम व्हिज्युअलायझर' या प्रकल्पाला देण्यात आले. तृप्ती पाटील, ममता पांडे, अंजली राठी, आदिती सोनवणे या विद्यार्थिनींना प्रा. आय. प्रियदर्शिनी यांचे मार्गदर्शन लाभले. हार्डवेर व सॉफ्टवेर या गटातील प्रथम पारितोषिक इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विभागातील कल्याणी देवरे, संजना कलंत्री, पूर्णा नाईक या विद्यार्थिनींना 'स्ट्रीट लाइटचे स्मार्ट व्यवस्थापन' या प्रकल्पावर काम करण्यासाठी देण्यात आले. प्रा. पूजा पाटील यांनी त्यांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे स्थापथ्य विभागातील '''इडेड स्लॅब', यांत्रिकी विभागातील 'रोबोट तसेच ड्रोन', विद्युत विभागातील 'इलेक्ट्रिकल ट्रॅक्टर', असे विविध समाजोपयोगी प्रकल्पांवर विद्यार्थ्यांनी काम केले. सृजनशीलता आणि नावीन्य ही २१ व्या शतकातील महत्त्वपूर्ण कौशल्ये आहेत. विद्यार्थ्यांचे कौशल्ये व कल्पनांना चालना मिळण्यासाठी प्रकल्प समाजाभिमुख व्हावेत, या उद्देशाने महाविद्यालयातर्फे हा उपक्रम राबविण्यात आला.